# प्रेस नोट

"वृंदावन पोलीस टाऊनशिप "

पोलीस मुख्यालय सातारा येथे पोलीस अधिकारी / अंमलदार यांच्याकरीता असलेली ब्रिटीशकालीन 100 वर्षापूर्वीची निवासस्थाने ही कौलारू,बैठ्या चाळीच्या स्वरूपातील,पडझड झालेली व राहण्यास अयोग्य तसेच संख्येने अपुरी असल्याने ती पाडून त्याठिकाणी नवीन निवासस्थाने बांधण्याकरीता प्रस्ताव पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून मा.व्यवस्थापकीय संचालक, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांना मा.पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या मार्फतीने सादर करण्यात आलेला होता.याअनुषंगाने सदर जागेमध्ये एकूण 698 निवासस्थाने त्यामध्ये पोलीस अंमलदार यांच्याकरीता 672 निवासस्थाने,पोलीस अधिकारी यांच्याकरिता 24 निवासस्थाने,पोलीस उपअधीक्षक यांच्याकरिता 02 बंगलो,01 मल्टीपर्पज हॉल,व्यायामशाळा व वाचनालय असे बांधकाम करण्याकरीता मा.व्यवस्थापकीय संचालक, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या,मुंबई यांच्याकडून प्रशासकीय मान्यता देण्यात येवून बांधकामासाठी मेसर्स हर्ष  कन्स्ट्रक्शन,नाशिक यांना नेमण्यात आले.

आज रोजी सदरचा गृहनिर्माण प्रकल्प पूर्ण होवून त्याचे उदघाटन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.श्री.देवेंद्र फडणवीस सो यांच्या हस्ते दि-02/01/2026 रोजी होत आहे.सातारा जिल्हा पोलीस दलाकरीता पोलीस मुख्यालय  सातारा येथे नव्याने बांधण्यात आलेल्या निवासस्थानांना "वृंदावन पोलीस टाऊनशिप " असे नांव देण्यात आले असुन येथील निवासस्थाने पोलीस अधिकारी/अंमलदार/मंत्रालयीन कर्मचारी व सफाईकामगार यांना वाटप करण्यात आलेली आहेत. सदर संकुलामध्ये 2 मेगा व्हॅटचे सबस्टेशन, 2 STP (सांडपाणी व्यवस्थापनासाठी), घन कचरा व्यवस्थापन युनिट यांची उभारणी करण्यात आलेली आहे.अशा या अत्यंत देखण्या व सर्व सोयींनी उपयुक्त अशा वृंदावन पोलीस टाऊनशिप मध्ये स्वच्छता,साफसफाई व बागेची देखभाल करणेकरीता BVG या खाजगी एजन्सीची नेमणूक करण्यात आली आहे. सदर ठिकाणी सुमारे 100 CCTV कॅमेरे बसवून व सुरक्षारक्षक नेमून सुरक्षितेची काळजी घेण्यात येत आहे.

सर्व पोलीस अधिकारी/अंमलदार/मंत्रालयीन कर्मचारी व सफाईकामगार यांना त्यांचे व कुटुंबियांचे जीवनमान उंचावण्यासाठी तसेच स्वच्छ वातावरणात,उच्च प्रतिच्या सुखयोयीचा उपभोग घेण्यासाठी शासन व पोलीस विभागातर्फे सुखसुविधा देण्यात आलेल्या आहेत.

